आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
२९ सप्टेंबर २०२५ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- अतिवृष्टीमुळं झालेल्या नुकसानीचे पंचनामे आठवडाअखेर पूर्ण होणार, दिवाळीआधी मदत देण्याचं महसूल मंत्र्यांचं आश्वासन

- जिल्हा नियोजन समितीचा १० टक्के निधी अतिवृष्टी, गारपीट किंवा पाणीटंचाईसारख्या परिस्थितीत वापरायला राज्यशासनाची परवानगी

- बारावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरण्यासाठी २० ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ

**आणि**

- नागपुरात दीक्षाभूमीवर उद्यापासून धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे कार्यक्रम

**<><><><><>**

राज्यात अतिवृष्टीमुळं झालेल्या नुकसानीचे पंचनामे या आठवडाअखेर पूर्ण होतील. दिवाळीपूर्वी सरकार शेतकऱ्यांना मदत करेल असं आश्वासन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिलं. अतिवृष्टीमुुळे राज्यात झालेलं नुकसान ही गेल्या ५० वर्षातील सर्वात मोठी आपत्ती असल्याचं ते म्हणाले….

**होल्ड बाईट बावनकुळे**

बावनकुळे यांनी आज नागपूर जिल्ह्यातल्या दाढेरा, तिडंगी, तेलगाव, नांदा गोमुख या गावांना भेट दिली. पंचनामे काटेकोरपणे व्हावेत यासाठी महसूल विभागाला आदेश देण्यात आले आहेत. ई - पंचनामे केले जात आहेत. प्रत्येक पंचनामा ग्रामसभेत दाखवणं अनिवार्य केलं असून, अधिकारी थेट शेतात जाऊन प्रत्यक्ष पाहणी करत आहेत, असं बावनकुळे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राज्यात सरासरीच्या तुलनेत ११७ टक्के पाऊस झाला आहे. कोल्हापुरातला ८५ टक्के आणि अमरावती, रायगड तसंच नाशिकमधला सुमारे

९५ टक्के वगळता इतर सर्व जिल्ह्यात सरासरीपेक्षा अधिक पावसाची नोंद झाली आहे. सर्वाधिक १७० टक्क्यांहून अधिक पाऊस सांगलीत झाला. जळगावमध्ये सरासरीच्या १४१ टक्के पावसाची नोंद झाली आहे.

अतिवृष्टीमुळं राज्यातले ४१ हजारांपेक्षा अधिक नागरिक स्थलांतरित झाले आहेत, अशी माहिती राज्य सरकारनं दिली आहे. सर्वाधिक १३ हजारांहून अधिक नागरिक सोलापूरात स्थलांतरित झाले आहेत. तर जालन्यात साडे ८ हजार, छत्रपती संभाजीनगरमध्ये ८ हजारांहून अधिक आणि धाराशिवमध्ये सुमारे ४ हजार नागरिक स्थलांतरित झाले आहेत.

<><><><><>

राज्यात सध्या पूरस्थितीमुळे शेतीची भीषण अवस्था झाली आहे, वातावरण बदलालाही शेतकरी तोंड देत आहेत. शेतकऱ्यांना त्यातून बाहेर काढण्यासाठी सरकार निश्चितच प्रयत्न करेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिली आहे. ते आज यवतमाळ इथं दीनदयाल सेवा प्रतिष्ठानच्या वतीनं आयोजित दीनदयाल जयंती समारंभात बोलत होते.

शाश्वत शेतीसाठी राज्य शासन पश्चिम विदर्भात राबवत असलेल्या नानाजी देशमुख कृषी समृद्धी योजनेखाली सध्या ४ हजार हेक्टर शेती आली आहे. दीनदयाल संस्था नैसर्गिक शेतीचे प्रयोग करीत असल्यामुळे या संस्थेलाही यात समाविष्ट करून घेतलं जाईल, असं त्यांनी सांगितलं.

मुख्यमंत्र्यांनी आज यवतमाळ शहरातल्या अवधूतवाडी पोलीस ठाण्याला भेट देऊन तिथल्या व्यवस्थेची पाहणी केली. यावेळी पोलीस प्रशासनानं पूरग्रस्तांच्या मदतीसाठी २७ लाख ११ हजार १११ रुपयांच्या निधीचा धनादेश त्यांना दिला. शहीद जवान पत्नी सुनिता प्रकाश विहीरे यांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते जमिनीचा पट्टा देण्यात आला.

**<><><><><>**

जिल्हा नियोजन समितीच्या निधीपैकी १० टक्के निधी अतिवृष्टी, गारपीट किंवा पाणी टंचाई यासारख्या परिस्थितीसाठी वापरण्याची मुभा राज्य सरकारनं दिली आहे. यासंदर्भातला शासन आदेश नियोजन विभागानं आज जारी केला. हा निधी खर्च करण्यासाठी मंजुरी देण्याचे अधिकार पालकमंत्र्यांना असतील आणि त्यानंतर होणाऱ्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत त्याला मान्यता घ्यावी लागेल.

**<><><><><>**

बुलढाणा जिल्ह्यातल्या पूरग्रस्त भागाला आज केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी भेट देऊन पाहणी केली. पूरग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी नुकसान भरपाई मिळावी यासाठी युद्धपातळीवर पंचनामे करून मदतीचा प्रस्ताव शासनाकडे पाठवण्याचे निर्देश त्यांनी यावेळी प्रशासनाला दिले. धुळे जिल्ह्यात आज पुन्हा पाऊस झाला असून अनेर, मालनगाव, अक्कलपाडा धरणातून पाण्याचा विसर्ग सुरूच आहे.

**<><><><><>**

राज्यातल्या इतर जिल्ह्यांमध्ये पूर परिस्थितीची पाहणी झाली. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड पाऊस व्हाइस कास्ट**

*(राज्यात बहुतांश ठिकाणी पूरग्रस्त शेतकरी आणि नागरिकांच्या मदतीसाठी शासन तत्पर असून मदत कार्य सुरू असल्याची माहिती राज्याचे जलसंपदा आणि आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी दिली आहे. ते आज नाशिक इथे गोदावरी नदी परिसराची पाहणी केल्यानंतर बोलत होते. सध्या ठिकठिकाणी शेतांमध्ये पाणी साचलं असून पाणी कमी होताच त्यांचे तातडीने पंचनामे करून शासनस्तरावरून मदत करण्यात येईल, असं आश्वासनही गिरीश महाजन यांनी दिलं. नाशिक विभागात पाऊस आणि पुरामुळे झालेल्या नुकसानाचे पंचनामे करून बाधितांना तात्काळ मदत करण्याचे आदेश विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी दिले आहेत.*

*सोलापूर जिल्ह्यात अतिवृष्टी आणि पूरस्थितीमुळे बाधित झालेल्यांना शासनाच्या वतीने अन्नधान्याचं मोफत वाटप करण्यात येत आहे. यात गहू, तांदूळ, तूरडाळ यांचा समावेश आहे. जिल्ह्यात जिथे जिथे पावसामुळे आणि पुरामुळे नुकसान झालं आहे, तिथे सर्व प्रकारची मदत द्यावी असं आवाहन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आज शासनाला केलं. ते आज पूरस्थितीच्या पार्श्वभूमीवर सोलापूर इथे सर्व विभाग प्रमुखांच्या आढावा बैठकीत बोलत होते.*

*नंदुरबार जिल्ह्यात चारशे हेक्टर जमिनीवरची केळी, पपई, मिरची आणि इतर पिकांचं नुकसान झालं आहे. नंदूरबारमध्ये डॉ. विजयकुमार गावित यांनी पावसामुळे झालेल्या नुकसानाची आज पाहणी केली.*

*तेलंगणातल्या श्रीरामसागर जलाशयातून १३ लाख क्युसेक्स इतका विसर्ग करण्यात आल्याने गडचिरोली जिल्ह्यात सिरोंचा इथे पूर येण्याची शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांनी आज तातडीची आढावा बैठक घेऊन प्रशासनाला सतर्क राहण्याचे निर्देश दिले.*

*सरकारने ओला दुष्काळ जाहीर करून हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत जाहीर करावी तसंच कर्जमाफी द्यावी अशी मागणी करत क्रांतिकारी शेतकरी संघटनेनं आज हिंगोलीत राज्य महामार्गावर आंदोलन केलं. )*

**<><><><><>**

राज्यात अतिवृष्टीमुळे गंभीर परिस्थिती निर्माण झाली असताना मुख्यालयात उपस्थित नसलेल्या एसटी आगारप्रमुखांवर तातडीनं कारवाई करण्याचे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत. अशा गंभीर परिस्थितीत आपल्या मुख्यालयात उपस्थित राहणं बंधनकारक असतानाही २५१ पैकी ३४ आगारांमधले आगारप्रमुख कर्तव्यावर हजर नसल्याचं एका गोपनीय अहवालात दिसून आलं आहे. त्यांच्यावर तातडीनं कारवाई करावी, तसंच अशा प्रकारचं बेजबाबदार वर्तन भविष्यात खपवुन घेतलं जाणार नाही, अशी ताकीद सरनाईक यांनी एसटी प्रशासनाला दिली आहे.

हे आगारप्रमुख ज्यांच्या अखत्यारित काम करतात त्या विभाग नियंत्रकांना देखील याबाबत विचारणा करणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राज्यात होत असलेली अतिवृष्टी आणि पूरपरिस्थितीमुळे इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांना परिक्षा अर्ज भरण्यासाठी येत्या २० ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय राज्य परीक्षा मंडळानं घेतला आहे. ही मुदत उद्यापर्यंत होती. मात्र मराठवाडा, नाशिक, सोलापूर, अहिल्यानगर आणि राज्यात होत असलेली अतिवृष्टिमुळे पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना मुदतीत परीक्षेसाठी अर्ज भरणं शक्य होत नसल्यानं मुदतवाढ देण्यासंदर्भात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांना निर्देश दिले होते. त्यानुसार मंडळानं हा निर्णय घेतला आहे.

बाह्य परीक्षार्थींसाठी देखील अर्ज भरण्याची मुदत १५ ऑक्टोबर पर्यंत वाढवली आहे. तसंच नवीन परीक्षा केंद्रासाठी अर्ज स्वीकारण्याची मुदत १० ऑक्टोबर पर्यंत वाढवली आहे.

**<><><><><>**

सेवा पर्व या विशेष मालिकेत आज ऐकूया समुद्रयान या भारताच्या पहिल्या मानवसहित खोल सागरी मोहिमेमुळे या क्षेत्रात देशाचं नाव कसं आघाडीवर येत आहे, त्याबद्दल…

***होल्ड… कॅप्सूल***

*(भारतानं २०११ मध्ये खोल समुद्रातल्या संशोधनासाठी समुद्रयान मोहिम सुरू केली होती. या मोहिमेचा उद्देश सागरी संसाधनं आणि नील अर्थव्यवस्था बळकट करणं हा आहे. भारतानं फ्रान्सच्या सहकार्यानं विकसित केलेल्या मत्स्य ६००० या पाणबुडीत तीन जलवीरांना सहा हजार मीटर इतक्या खोल समुद्रात घेऊन जायची क्षमता आहे. या मोहिमेत कमांडर जतिंदर पाल सिंह आणि राजू रमेश यांनी पाच हजार मीटरपर्यंत जाऊन इतिहास रचला आहे.*

*यंदाच्या स्वातंत्र्यदिनाच्या भाषणात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समुद्रात तेल आणि वायूसाठ्यांचा शोध घेण्यासाठीच्या राष्ट्रीय खोल सागरी शोधमोहिमेची*

*घोषणा केली होती. या मोहिमेचं नाव समुद्र मंथन असं आहे आणि ऊर्जा क्षेत्रात आत्मनिर्भर होण्याच्या दिशेनं हे एक महत्त्वाचं पाऊल आहे.*

***होल्ड... बाईट- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी***

*खोल समुद्रातल्या संशोधनामुळं भारताला विविध खनिजं, जैव विविधता, ऊर्जा यासारख्या क्षेत्रातल्या संधींचा लाभ घेता येईल आणि खोल समुद्रात संशोधन करणाऱ्या काही मोजक्या देशांच्या पंक्तीत जाण्याची संधी मिळेल.)*

**<><><><><>**

धार्मिक, राजकीय आणि सामाजिक आंदोलनांदरम्यान दाखल झालेल्या खटल्यांबाबत आलेल्या २०१ अर्जांपैकी ७७ अर्जदारांवरचे खटले मागं घेण्याची शिफारस, राज्य सरकारच्या मंत्रिमंडळ उपसमितीनं केली आहे. या उपसमितीची बैठक आज मुंबईत सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यानंतर शेलार यांनी बातमीदारांना ही माहिती दिली.

स्त्रीविषयक गुन्हे, गंभीर स्वरूपाचे खटले, वैयक्तिक आणि दिवाणी, अशा प्रकरणांवर मात्र खटले मागं घ्यायला स्पष्ट नकार दिला असल्याचं त्यांनी सांगितलं. तसंच, आजी-माजी आमदार, खासदार यांच्याशी संबंधित सहा प्रकरणांबाबत, मुंबई उच्च न्यायालयातच अंतिम निर्णय घ्यावा लागेल. त्या दिशेनंही पावलं उचलली जात असल्याचं शेलार यांनी सांगितलं.

**<><><><><>**

रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीची ३ दिवसीय द्वैमासिक आढावा बैठक आजपासून मुंबईत सुरू झाली. गव्हर्नर संजय मल्होत्रा परवा सकाळी १० वाजता या बैठकीतल्या निर्णयांची घोषणा करतील. सध्या चलनवाढीचा दर आटोक्यात असल्यानं रिझर्व्ह बँकेकडून व्याजदरांमध्ये बदल होण्याची शक्यता कमी असल्याचं तज्ज्ञांचं मत आहे. जून महिन्यात बँकेनं रेपो दर अर्धा टक्क्यानं कमी केला होता मात्र ऑगस्ट महिन्यात रेपो दरात काहीही बदल केला नव्हता.

**<><><><><>**

जीएसटी दरातल्या कपातीमुळं १८०० सीसी पेक्षा कमी क्षमतेच्या ट्रॅक्टर्सवरचा जीएसटी १२ वरून ५ टक्के इतका कमी झाला आहे. यामुळे ट्रॅक्टरचे दर कमी झाले आहेत. शेतीसाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्रीवरचा जीएसटीही कमी झाला आहे. कापणी, मळणी आणि खतनिर्मितीसाठी लागणाऱ्या यंत्रांवरचा जीएसटीही १२ वरून ५ टक्के झाला आहे.

**होल्ड.... व्हिसी**

**<><><><><>**

नागपुरात दीक्षाभूमीवर उद्यापासून धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे कार्यक्रम सुरु होणार आहेत. भंते नागार्जुन सुरई ससाई यांच्यातर्फे उद्या बौद्ध धम्माची दीक्षा देण्याचा कार्यक्रम, तर १ ऑक्टोबरला देश-विदेशातल्या बौद्ध भिक्खूंच्या उपस्थितीत धम्म परिषद होणार आहे. ६९ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त २ ऑक्टोबरला मुख्य सोहळा होणार आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे सचिव डॉ. राजेंद्र गवई यांनी आज दीक्षाभूमीवर आयोजित वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली.

**<><><><><>**

हैदराबाद गॅझेटनुसार बंजारा समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गातून आरक्षण द्यावं या मागणीसाठी आज वाशिम आणि नांदेडमधे मोर्चा काढण्यात आला. यात महिला, तरुण, ज्येष्ठांसह हजारो नागरिक पारंपरिक वेशभुषेत सहभागी झाले होते.

तर बंजारा आणि धनगर समाजाचा अनुसूचित जमातीत समावेश करू नये या मागणीसाठी बीडमधे आदिवासींचा मोर्चा निघाला. अनुसूचित जमाती कायद्यामधल्या सुधारणा रद्द कराव्यात, अनुसूचित क्षेत्रातल्या १३ जिल्ह्यातल्या १७ संवर्ग पदावर नियुक्त झालेल्या उमेदवारांना कायम करण्यात यावं, आदिवासींची

१२ हजार ५०० पदांची रखडलेली पदभरती करावी, या मागण्याही आंदोलकांनी केल्या.

**<><><><><>**

नागपूर इथं आज संविधान सत्याग्रह पदयात्रेला आज महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी यांच्या उपस्थितीत सुरुवात झाली. संविधान वाचवणं, नागरिकांच्या अधिकारांचं संरक्षण करणं हे या पदयात्रेचं उद्दिष्ट आहे, असं तुषार गांधी यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात, कोकणात बहुतांश ठिकाणी, विदर्भात काही ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**